# मुंबई विद्यापीठ

**स्मरणपत्र —१**
**अतितात्काळ**

क्र. सीटीएयु/ २८ /२०२०—२०२१

संदर्भ:— क्र. टीएएएस(युटी/सीटी)/४/२०२०—२०२१ दि. १५/०९/२०२०

**परिपत्रक :—**

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकानुसार मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानीत व कायम विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि समाजशास्त्र, महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना पुन:श्च कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयांमध्ये सुरू असणारे स्वयंअर्थसहायित कोर्सेस (Self Financed Courses) करिता शिकविणाऱ्या विद्यापीठ मान्यता प्राप्त व हंगामी शिक्षकांचे वेतन बऱ्याच कालावधीपासुन मिळाले नसल्याबाबतच्या बऱ्याच तक्रारी विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या आहेत.

तसेच विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ३१ मार्च, २०२० रोजी संपन्न झालेल्या बैठकीत सदस्यांनी चर्चेच्या अनुषंगाने मा. कुलगुरू यांना बऱ्याचशा महाविद्यालयांमध्ये स्वयं अर्थ सहायित (Self Financed Courses) अभ्यासक्रमांच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन बऱ्याच कालावधीपासुन झालेले नसल्याचे निर्दशनास आणुन दिलेले आहे.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने याची गंभीर दखल घेतली असून माननीय कुलगुरूंच्या आदेशानुसार संस्थाचे अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांना सूचित करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयांमध्ये सुरू असणारे विनाअनुदानित स्वयंअर्थसहायित कोर्सेस (Self Financed Courses) शिकविणाऱ्या शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन तात्काळ प्रथम प्राधान्याने अदा करण्यात यावेत.

मुंबई — ४०० ०३२.
दिनांक :— ५ मार्च, २०२१

( रविंद्र द. साळवे )
उपकुलसचिव
(महाविद्यालयीन शिक्षक मान्यता कक्ष)

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय आणि अशासकीय, अनुदानीत व विनाअनुदानित, पारंपारिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांचे प्राचार्य व संबंधीत संस्थाचे अध्यक्ष/ सचिवयांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीस्तव सादर :—

१. समन्वयक, विद्यापीठ संगणकीय केंद्र (यु.सी.सी.), विद्यानगरी कॅम्पस, मुंबई — ४०० ०९८.
२. जनसंपर्क अधिकारी, मुंबई विद्यापीठ, मुंबई — ४०० ०३२.
३. सहायक कुलसचिव, कार्यकारी प्राधिकरणे विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई — ४०० ०३२.
४. सचिव, मुंबई विद्यापीठ, प्राचार्य संघटना, प्रगती महाविद्यालय, डोंबिवली—४२१ २०१.
५. डॉ. टी. ए. शिवारे, अध्यक्ष, A.M.G.C. Director, विल्सन महाविद्यालय, चौपाटी, मुंबई—०७.
६. मुप्ता (MUPTA) संघटना, १०३, गोराई, सम्राट अशोक को. हाऊ. सोसायटी, प्लॉट नं. १०२, गोराई—२, बोरिवली (पश्चिम), मुंबई— ४०० ०९१.
७. मा. अध्यक्ष (UMASA), समाजशास्त्र विभाग, रानडे भवन, कलिना, मुंबई — ४०० ०९८.
८. मा. अध्यक्ष (MUCTA), खोली नं ४७, रानडे भवन, कलिना, मुंबई — ४०० ०९८.
९. ॲड.मनोज टेकाडे, अध्यक्ष, प्रहार विद्यार्थी संघटना, ६६ सी विंग, मनोरा आमदार निवास, नरीमन पॉईट, मुंबई — ४०० ००२.
१०. मा. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
११. स्वीय सहायक, प्र—कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.
१२. स्वीय सहायक, प्रभारी कुलसचिव, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२.